admn17-18


# महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,

**आय्‌एस्‌ओ ९००१ : २००८ मानांकित संस्था**

**१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७.**

MCAER कृषि परिषद

**ई-मेल : edn_mcaer@rediffmail.com** **दूरध्वनी (०२०) २५५३ ७६८८.**

**वेबसाईट : www.mcaer.org** **फॅक्स (०२०) २५५३ ३७६४.**


जा.क्रःमकृप/शिक्षण-१/२०१७/२२३८ दिनांक १२ सप्टेंबर,२०१७

## प रि प त्र क

**विषयः-** **राज्यातील चारही कृषी विद्यापीठांतर्गत पदवी अभ्यासक्रमाच्या शासकीय / अनुदानित व विना अनुदानित महाविद्यालयातील रिक्त जागा तसेच विना अनुदानित महाविद्यालयातील व्यवस्थापन कोटयातील रिक्त जागा भरण्याबाबत.**
**प्रवेश फेरी कालावधी- दि. १८ ते २० सप्टेंबर,२०१७**

सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षामधील चारही कृषी विद्यापीठांतर्गत पदवी अभ्यासक्रमाच्या पहिल्या वर्षाची केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन पध्दतीने दि.३१/८/२०१७ पर्यंत राबविण्यात आली. यानंतर दि. १ ते ३ सप्टेंबर,२०१७ या कालावधीत कायमस्वरूपी विना अनुदानित महाविद्यालयातील व्यवस्थापन कोटयाची वाढीव प्रवेश फेरी राबविण्यात आली. मात्र यानंतरही कृषी विद्यापीठांतर्गत पदवी अभ्यासक्रमाच्या रिक्त जागा भरण्याबाबत विविध विना अनुदानित महाविद्यालये आणि असोसिएशन ऑफ दि मॅनेजेमेंट ऑफ ॲग्रीकल्चर ॲण्ड ॲग्रीकल्चर अलाईड कॉलेजेस या कायमस्वरूपी विना अनुदानित महाविद्यालयांच्या संघटनेची मागणी विचारात घेता, दि. १८ ते २० सप्टेंबर,२०१७ या कालावधीत राज्य कोटा, विद्यापीठ कोटा आणि व्यवस्थापन कोटयात संबंधित महाविद्यालयस्तरावर प्रवेश प्रक्रिया राबविण्याचे या परिपत्रकाद्वारे सूचित करण्यात येत आहे.

सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षाच्या विद्यापीठ / राज्यस्तरीय गुणवत्ता यादीमधील अप्रवेशित उमेदवार या प्रवेश प्रक्रियेद्वारे प्रवेशाकरिता पात्र असतील. प्रवेश फेरीची कार्यपध्दती यासोबतच्या परिशिष्टामध्ये नमूद करण्यात आली आहे.

**सोबत- परिशिष्ट** **स्वाक्षरीत/-**
**महासंचालक**

प्रति,

१. कुलसचिव / अधिष्ठाता (कृषी), महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी, जि.अहमदनगर / डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ,अकोला / वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी / डॉ.बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठ, दापोली जि.रत्नागिरी.

२. मे.कल्प टेक्नॉलॉजीज प्रा.लि., शॉप १ व २, राधाकांत को-ऑप हौसिंग सोसायटी, रामबाग कॉलनी, कृष्णा हॉस्पीटलसमोर, पौड रोड, पुणे ४११ ०३८.

    २/- त्यांना सूचित करण्यात येते की, पदवी अभ्यासक्रमाच्या वरील प्रवेश कार्यपध्दतीविषयी सर्व कृषी विद्यापीठांतर्गत सर्व महाविद्यालयांना तसेच राज्यस्तरीय प्रवेश गुणवत्ता यादीतील सर्व उमेदवारांना अवगत होण्याच्या दृष्टिकोनातून सदरचे परिपत्रक संकेतस्थळावर प्रसिध्द करावे तसेच प्रत्येक महाविद्यालयाच्या 'लॉग इन'मध्ये योग्य त्या सुविधा उपलब्ध करून द्याव्यात **आणि तद्नुसार संबंधित सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य तसेच राज्यस्तरीय गुणवत्ता यादीतील सर्व उमेदवार यांना ई-मेल / 'एस्‌एम्‌एस्'द्वारे कळविण्यात यावे.**

३. मे. जे. डी. आय. एन. सॉफ्ट, ई-१४,वर्ल्ड ऑफ मदर कॉम्प्लेक्स,जय गणेश व्हिजन,आकुर्डी,पुणे ४११०३५.

    २/- त्यांना सूचित करण्यात येते की, कृषी परिषदेच्या संकेतस्थळावर सदर परिपत्रक प्रसिध्द करण्यात यावे.

४. मा. मंत्री (कृषी) तथा अध्यक्ष, कृषी परिषद यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई-३२.

# <u>परिशिष्ट</u>

## दि. १८ ते २० सप्टेंबर,२०१७ या कालावधीत राबवावयाच्या पदवी अभ्यासक्रमाच्या जागेवर प्रवेश फेरीची (Spot Admission) कार्यपध्दती

सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षाच्या प्रवेश प्रक्रियेंतर्गत राबविण्यात आलेल्या प्रवेश फेऱ्यांद्वारे प्रवेश मिळालेल्या उमेदवारांनी नोंदणी न केल्याने अथवा इतर कारणाने जागा रिक्त असल्यास अशा रिक्त जागांसाठी दि. १८ ते २० सप्टेंबर,२०१७ या कालावधीत संबंधित महाविद्यालयस्तरावर खालील कार्यपध्दतीने जागेवर प्रवेश फेरी (**Spot Admission Round**) राबविण्यात यावी.

अंतिम गुणवत्ताविषयक प्रवर्गनिहाय (Categorywise Last Merit) तपशील व अद्ययावत रिक्त जागांचा प्रवर्गनिहाय तपशील कल्प टेक्नॉलॉजीज प्रा.लि., पुणे ('केटीपीएल'-KTPL) यांच्याकडून **<u>www.mcaer.org</u>** व **<u>maha-agriadmission.in</u>** या संकेतस्थळावर उपलब्ध राहील. **सर्व महाविद्यालयांनी त्यांच्याकडील प्रवेशविषयक माहिती संकेतस्थळावर वेळोवेळी अद्ययावत करावी म्हणजे रिक्त जागांचा अद्ययावत तपशील संकेतस्थळावर त्या-त्यावेळी उपलब्ध होईल.**

**राज्यस्तरीय / विद्यापीठस्तरीय गुणवत्ता यादीत समाविष्ट असलेले आणि चालू शैक्षणिक वर्षाच्या पदवी प्रवेश प्रक्रियेद्वारे प्रवेशित नसलेले (not admitted) उमेदवार या जागेवर प्रवेश फेरीकरिता पात्र असतील.** अशा पात्र उमेदवारांनी तसेच संबंधित महाविद्यालयांनी खालील बाबी विचारात घ्याव्यात.

(१) संकेतस्थळावरील रिक्त जागांचा तपशील विचारात घेऊन उमेदवारांना ज्या महाविद्यालयात प्रवेश घ्यावयाचा आहे, त्या महाविद्यालयात दि. १८ ते २० सप्टेंबर,२०१७ **या कालावधीत सकाळी १०.०० ते दुपारी १३.०० या कालावधीत** आवश्यक ती सर्व मूळ कागदपत्रे व शुल्कासह उमेदवारांनी उपस्थित राहावे.

(२) संबंधित महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता / प्राचार्य यांनी स्वतः **सकाळी १०.०० ते दुपारी १३.०० या वेळेत उपस्थित असलेल्या उमेदवारांची प्रवर्गनिहाय गुणवत्ता यादी तयार करून ती नोटीस बोर्डवर प्रसिध्द करावी.**

(३) वरीलप्रमाणे पात्र उमेदवारांचा गुणानुक्रमे विचार करून रिक्त जागांसाठी प्रवेश देण्यात यावेत. **आरक्षित प्रवर्गातील रिक्त जागांसाठी संबंधित प्रवर्गाच्या उमेदवारांनाच प्राधान्यक्रमाने प्रवेश देण्यात यावेत.** संबंधित आरक्षित प्रवर्गाचे उमेदवार उपलब्ध नसल्यास, शासन निर्णय, कृषी व पदुम विभाग, क्र.मकृवि-२०१०/प्र.क्र.१५५/७अे, दि.२०/१०/२०११ मधील परिशिष्ट २ येथील प्रवेश कार्यपध्दतीनुसार अशा रिक्त जागांवर 'जागेवर प्रवेश फेरीच्या' (Spot Admission Round) शेवटच्या दिवशी म्हणजेच **दि. २० सप्टेंबर,२०१७ रोजी** उपस्थित असलेल्या इतर उमेदवारांना गुणानुक्रमाने प्रवेश देण्यात यावेत. सदर शासन निर्णय पदवी प्रवेश माहिती पुस्तिकेसोबतच्या **<u>परिशिष्ट-'अे'</u>** येथे उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. **मात्र कोणत्याही परिस्थितीत आरक्षित जागांवर नियमानुसार प्रवेश मिळाला नाही, अशी तक्रार आरक्षित प्रवर्गाच्या उमेदवारांकडून येणार नाही, याची दक्षता संबंधित सहयोगी अधिष्ठाता / प्राचार्य यांनी घ्यावी.**

(४) योग्य त्या उमेदवाराची प्रवेशासाठी निवड निश्चित झाल्यास त्याप्रमाणे **कल्प टेक्नॉलॉजीज प्रा.लि., पुणे ('केटीपीएल'-KTPL) यांच्या संकेतस्थळावर नोंदणी करून 'लॉग इन'द्वारे महाविद्यालयांनी संबंधित उमेदवारास प्रवेश द्यावा.** यासाठी संकेतस्थळावरील महाविद्यालयांच्या 'लॉग इन'मध्ये योग्य ती सुविधा उपलब्ध करून देण्याची जबाबदारी 'केटीपीएल' यांची असेल.

(५) दि. १८ ते २० सप्टेंबर,२०१७ या कालावधीत दररोज सायंकाळी ४.३० पर्यंत वरील प्रवेश प्रक्रिया संबंधित महाविद्यालयस्तरावर करण्यात यावी.

(६) महाविद्यालयांनी दरदिवशी प्रवेश देण्यात आलेल्या प्रवेशांबाबतचा तपशील **संचालक (शिक्षण) व 'केटीपीएल' यांच्याकडे सायंकाळी ५.०० वाजेपूर्वी ई-मेलद्वारे कळवावा.**

(७) जागेवर प्रवेश फेरीद्वारे प्रवेश मिळालेल्या उमेदवारास त्याच्या 'लॉग इन'मध्ये प्रशासकीय कारणास्तव 'केटीपीएल'ने तात्पुरते 'प्रवेश वाटप पत्र' उपलब्ध करून द्यावे.

(८) जागेवरील प्रवेश फेरीच्या कालावधीमध्ये उमेदवाराने प्रवेश रद्द केला असल्यास किंवा इतर कारणामुळे प्रवेश रद्द केल्यास, यामुळे रिक्त झालेली जागा त्याच दिवशी संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी, मात्र त्याच दिवशी भरण्यात येऊ नये. अशी रिक्त जागा दुस-या दिवसापासून प्रवेशाकरिता उपलब्ध करून देण्यात यावी. (जागेवरील प्रवेश फेरीच्या शेवटच्या दिवशी रिक्त होणा-या जागांसंदर्भात ही बाब लागू नसेल.)